सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव सागर विठ्ठलजी डहाके
वय २५ वर्ष व्यवसाय गॅरेज
राहणार - माथनी ता मौदा ,जिल्हा नागपूर.

<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा</u>

मी आरोपी विशाल याला ओळखत नाही. घटना ही अंदाजे दीड ते दोन वर्षापुर्वी सायंकाळी सहा ते सात वाजताचे सुमारास माथनी टी पॉईंट येथे घडली होती. तेथे काय झाले होते ते मला माहीत नाही. त्यावेळी मी तेथे हजर नव्हतो. पोलीसांनी मला पंचनामाकामी बोलविले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यावर माझी सही असुन मजकुर माहीत नाही. करिता सदर पंचनाम्यास सहीपुरता **<u>निशानी क्रमांक १४</u>** देण्यात येते. आता मला नोटीसची प्रत दाखविली. त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करिता समन्सच्या प्रतीला **<u>निशानी क्रमांक १५</u>** देण्यात येते.

**साक्षीदार सरकारी पक्षास समर्थन करीत नसल्याने सरकारी वकिलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. करिता परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे आहे की माझे घटनेच्या वेळी गॅरेज माथनी फाटा येथे होते. हे म्हणणे खरे आहे कि मी ते गॅरेज सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चालु ठेवत असे. हे म्हणणे खरे आहे की त्या गॅरेजवर काम करणारा मी एकटाच होतो. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ९.२.२०२० रोजी सकाळी ९ वाजता मी माझे गॅरेज उघडले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यादिवशी दिवसभर मी गॅरेजमध्ये होतो. हे म्हणणे खरे आहे की त्यादिवशी संध्याकाळी पाउणे सहा वाजताचे सुमारास माथनी पुलीया येथे टोल नाक्याकडुन एक आयसर गाडी येत होती. हे म्हणणे खरे आहे की त्या गाडीने माथनी फाटयावर यु टर्न घेण्यासाठी टर्न घेतला. हे मला माहीत नाही कि त्यावेळी माथनी पुलीयाकडुन एक दुचाकी मागुन आली होती. हे मला माहीत नाही कि त्यावेळी टोल नाक्याकडुन मौद्याकडे जाणारा एक ट्रक तेथे आला होता, त्यामुळे यु

टर्न घेणा–या आयसर गाडीने त्याचे गाडी रस्त्याच्या मध्ये थांबविली होती. हे मला माहीत नाही कि त्यामुळे त्या दुचाकी स्वाराने त्या आयसर गाडीस धडक दिली व तो खाली पडला होता. हे मला माहीत नाही कि त्यामुळे त्याची दुचाकी ट्रकच्या खाली घुसली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे तेथे गर्दी जमली होती व ती गर्दी पाहुन मी तेथे गेलो होतो. हे मला माहीत नाही कि त्या दुचाकी स्वाराच्या डोक्याला पडल्याने मार लागला होता. हे मला माहीत नाही कि त्यावेळी एक ॲम्बुलन्स येवुन माझेसमक्ष त्या दुचाकी स्वाराला मौदा येथील दवाखान्यात नेले होते. हे मला माहीत नाही कि त्या आयसर गाडीचा क्रमांक एम एच ४०– एके १५५१ असा होता व मोटरसायकलचा क्रमांक एम एच ३५–ए एम २२०९ असा होता. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर तेथे पोलीस आले होते व घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पोलीसांनी मला पंच म्हणुन चालण्यासाठी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी पोलीसांसोबत घटनास्थळावर गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की तेथे आयसर गाडी रोडवर उभी होती व मोटरसायकल ट्रकखाली होती. हे म्हणणे खरे नाही की त्या घटनास्थळाचा नकाशा पोलीसांनी माझेसमक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की त्याबाबतचा घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी माझेसमक्ष तयार करुन तो मला वाचुन दाखविला व त्यावर मी समजुन सही केली. आता मला माझे बयानातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविला तो बरोबर नाही. पोलीसांनी माझे बयानात तसा मजकुर का नमुद केला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझे ओळखीचा असल्याने त्याला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीचे ॲड.श्री. पी बी सांगडीकर यांचे द्वारे –**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.                                        श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.
दिनांक २८.१०.२०२१

(एस.पी वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा